# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक. :
२५६०१२६४
२५६०१२६५
ई—मेल— pldvp@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
नियोजन व विकास विभाग

संदर्भ — साफुपुवि/निववि/१६२४ दिनांक ८/१०/२०१४

**अत्यंत तातडीचे**

प्रति,
मा. विभाग प्रमुख,
सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभाग.

विषय — वार्षिक अहवाल सन २०१३—१४ साठी माहिती देणेबाबत.
( दि. १ जुलै २०१३ ते ३० जून २०१४ पर्यंत)
संदर्भ — या कार्यालयाचे पत्र क्र. पुवि/निववि/८३२, दि. ९ जुलै, २०१४
क्र. पुवि/निववि/२४२०, दि. १ सप्टेबर, २०१४.

महोदय/महोदया,

विद्यापीठ विभाग, संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था यांनी पाठविलेल्या माहितीच्या आधारे सन २०१३—२०१४ या वर्षाचा वार्षिक अहवाल तयार करण्याचे काम सध्या या विभागात सुरु आहे. सदर वार्षिक अहवाल हा विधीमंडळाच्या सभापटलावर मंजूरीसाठी ठेवण्यात यावयाचा असल्याने सदर माहिती पाठविणे बंधनकारक असून देखील आजपर्यंत आपल्या विभागाकडून माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. ज्या विभागांनी यापूर्वी माहिती पाठविलेली आहे त्यांनी पुन:श्च माहिती पाठविण्याची आवश्यकता नाही.

आपल्या विभागाकडून **दिनांक १७ ऑक्टोंबर, २०१४** पूर्वी माहिती प्राप्त झाली नाही तर आपल्या विभागाच्या नांवापुढे माहिती उपलब्ध नाही असे शासनास कळविण्यात येईल आणि त्याअनुषंगाने शासनाकडून व विद्यापीठाकडून मिळणारे विशेष अनुदान यावर विपरित परिणाम झाल्यास या सर्व होणा—या परिणामास वार्षिक अहवालाची माहिती न पाठविणारे विद्यापीठ विभाग सर्वस्वी जबाबदार राहतील याची आपण गांभीर्याने नोंद घ्यावी तसेच आपल्या विद्यापीठ विभागाचा शासन स्तरावर/विद्यापीठ अनुदान आयोगाकडे केला जाणारा पत्रव्यवहार पुढील कार्यवाहीसाठी पाठविला जाणार नाही.

मा. कुलगुरु यांनी विभाग प्रमुखांसाठी आयोजित केलेल्या सभेमध्ये वार्षिक अहवालासाठी माहिती पाठविण्यासंदर्भात आपणास केलेल्या आवाहनास अनुसरुन व वरील सर्व बाबीचा वार्षिक अहवाल समितीच्या सभेमध्ये गांभीर्याने विचार करुन वार्षिक अहवालासाठी आवश्यक असलेली माहिती या कार्यालयास **दि. १७ ऑक्टोंबर, २०१४ पूर्वी** पाठवावी त्याचप्रमाणे या विभागाच्या pldvp@unipune.ac.in या ई—मेलवर माहितीची एक प्रत पाठवावी. यासंदर्भात आपल्या विभागाशी पुन:श्च पत्रव्यवहार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

Balllll 8/10
उपकुलसचिव
नियोजन व विकास

प्रत —
मा. कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ७.
मा.संचालक, म.वि.वि.मं., सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ७